ठाणे, शनिवार दि. ४ मे २०२४ | वर्ष : १३, अंक : ०६, पाने : ४, किंमत : २ रुपये | Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026

लोकसभेचा संग्राम

दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध

संपादक : चंद्रकांत भोईटे

**तापमान**

कमाल ४१° से | किमान २८° से

**बाजार**

सोने ७२,६०० | चांदी ८४,०००

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



माझी गॅरंटी आहे की, अच्छे दिन आता येतीलच.मत द्या, मत...

**थोडक्यात घडामोडी**

## मेट्रोच्या तिकीटावर मिळणार १० टक्के सवलत

मुंबई: मुंबई मेट्रो मार्ग २ अ आणि ७ च्या सर्व प्रवाशांना २० मे, २०२४ रोजी प्रवासी तिकिटावर (मूळ तिकिटदरावर) १०% सवलत देण्याचा महत्त्वाचा निर्णय महामुंबई मेट्रो संचलन महामंडळाने घेतला आहे. ही सवलत मुंबई मेट्रो १ कार्ड, मोबाईल क्यूआर तिकीट, पेपर तिकीट अशा सर्व माध्यमातून देण्यात येणार आहे. मुंबई मेट्रो मार्ग २ अ आणि ७ च्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे ९० कोटी नागरिकांनी प्रवास केला असल्याने मुंबई मेट्रोचा उपयुक्तता अधोरेखित झाली आहे.

मुंबई मध्ये लोकसभा निवडणूक – २०२४ च्या पाचव्या टप्प्यातील मतदान २० मे, २०२४ रोजी पार पडणार आहे. खर तर हा लोकशाहीचा उत्सव आहे. मतदार म्हणून मतदान करण्याकरीता या उत्सवात लोकांची भूमिका फार महत्त्वाची आहे. मतदान प्रक्रियेमध्ये मतदारांचा जागरूकपणे सहभाग वाढावा यासाठी शासनामार्फत सर्व स्तरातून जनजागृती करण्यात येत आहे. सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत नागरिकांना मेट्रोच्या माध्यमातून आरामदायक प्रवास करत, मतदानाचा आपला हक्क बजावता यावा यासाठी महामुंबई मेट्रो प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये मतदान करण्यासाठी मेट्रो प्रवाशांना प्रोत्साहित करून त्यांच्या मतदानाच्या कर्तुत्वाबाबत जाणीव करून देण्यासाठी, महामुंबई मेट्रो मतदार जागरूकता आणि सहभाग (SVEEP) या उपक्रमात सक्रिय सहभाग घेत आहे. मुंबई मेट्रोने जास्तीत जास्त नागरिकांनी प्रवास करावा या दृष्टीने महामुंबई मेट्रो प्रयत्नशील आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करता येईल आणि त्यांना केंद्रापर्यंत आरामदायक प्रवास करता येणार आहे.

## ऐन उन्हाळ्यात कलिंगड विक्री थंड

नवी मुंबई : उन्हाळा सुरू होताच थंडगार शीतपेय, रसाळ फळांना अधिक मागणी असते. यंदा तर अधिक उष्मा आहे. मात्र असे असताना देखील सध्या बाजारात आंब्याचा हंगाम सुरू असल्याने कलिंगडची मागणी रोडावली आहे. उन्हाळ्याची चाहूल लागताच एपीएमसी फळ बाजारात थंडगार, रसाळ फळांच्या हंगामाला सुरुवात होत असते. आंब्यापाठोपाठ फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात फळ बाजारात कलिंगड दाखल होण्यास सुरुवात होते तर मार्च–एप्रिलपासून मागणीत वाढत होते.

सध्या बाजारात लाल रंगाच्या रसरशीत शरीराला थंडावा देणारी कलिंगड बाजारात मुबलक उपलब्ध झाली असून, तिची चव चाखण्यासाठी ग्राहकांनी मात्र पाठ फिरवली आहे, असे मत व्यापाऱ्यांनी व्यक्त केले आहे. एपीएमसीत सध्या महाराष्ट्रसह तमिळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटक येथून आवक होते. सध्या बाजारात कलिंगडच्या १०० ते १३० गाड्या दाखल होत आहेत. घाऊक बाजारात प्रतिकिलोला ११ते १२ रुपये दर आहेत. (पान २ वर)







# निवडणुकीत विरोधक चारीमुंड्या चीत होतील

## ठाण्यात महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांचा उमेदवारी अर्ज दाखल

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विश्वास

**ठाणे – हिंदुहृदयसम्राट बाळासाहेबांच्या विचारांवर चालणारा ठाणे जिल्हा असून तो धर्मवीर आनंद दिघेंचाही जिल्हा आहे. धर्मवीरांना साजेसे काम आपल्याला करायचे आहे. बाळासाहेबांचे आशिर्वाद आपल्या पाठिशी आहेत. त्यामुळे महायुतीचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते एकजुटीने काम करतील आणि विरोधक चारीमुंड्या चीत होतील, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.**

ठाणे लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी निघालेल्या विराट प्रचार रॅलीला मुख्यमंत्र्यांनी संबोधित केले. (पान २ वर)



## भाजप कार्यकर्त्यांचा विरोध मावळला

### गणेश नाईक यांची ठाणे लोकसभेच्या उमेदवारीवरून प्रतिक्रिया, मुख्यमंत्र्यांना भेटलो, हस्तांदोलन झाले आणि...

ठाणे : ठाणे लोकसभेची उमेदवारी शिवसेनेला मिळाल्यानंतर गुरुवारी भाजपचे नेते गणेश नाईक यांच्या कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त करत राजीनामा सत्र सुरू केले होते. परंतु शुक्रवारी गणेश नाईक हे स्वत: नरेश म्हस्के यांचा अर्ज दाखल करण्यास उपस्थित होते. अर्ज दाखल करताना गणेश नाईक यांनी माध्यमांसमोर येत प्रतिक्रिया दिली. मुख्यमंत्र्यांना भेटलो, हस्तांदोलन झाले आणि चांगले काम करायचे ठरले असे गणेश नाईक म्हणाले.

शिवसेनेचे नरेश म्हस्के यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर नवी मुंबईतील गणेश नाईक यांच्या शेकडो पदाधिकाऱ्यांनी पदाचे राजिनामे दिले आहेत. मिरा भाईंदरमध्येही भाजपचे कार्यकर्ते नाराज आहेत. परंतु शुक्रवारी म्हस्के यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी गणेश नाईक हे त्यांचे पुत्र संजीव नाईक आणि संदीप नाईक यांच्यासोबत उपस्थित होते. गणेश नाईक यांना नाराजीबद्दल विचारले असता, ते म्हणाले की, एखाद्याने निवडणुकीसाठी ईच्छा व्यक्त करणे हा गुन्हा आहे का? परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनिवण्यासाठी महायुतीच्या सर्व उमेदवारांना निवडून आणण्याची आम्ही भूमिका घेतली आहे. मोदींना पंतप्रधान बनविण्यासाठी आपल्याला सर्व गोष्टी दाबून धराव्या लागतील आणि काम करावे लागेल. कार्यकर्त्यांमधील नाराजी हळूहळू कमी केली आहे. ती नाराजी लवकरच पूर्णपणे दूर होईल असा दावा त्यांनी केला.

नरेंद्र मोदी यांच्यासाठी आम्हाला ४८ जागा प्रतिष्ठेच्या आहेत. ज्या ठिकाणी कार्यकर्त्यांना जबाबदारी दिली आहे. ती जबाबदारी कार्यकर्ते पूर्ण करणार आहेत. नरेंद्र मोदी यांच्यासाठी महायुतीचे कार्यकर्ते कामाला लागतील असा विश्वास नाईक यांनी व्यक्त केला.

## नरेश म्हस्केंच्या मिरवणुकीत दोन गटात हाणामारी



ठाणे : ठाणे लोकसभा मतदारसंघातील शिंदेंच्या शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के यांचा अर्ज भरण्यासाठी गुरुवारी काढण्यात आलेल्या मिरवणुकीदरम्यान दोन गटात जोरदार हाणामारी झाली. यामुळे मिरवणुकीत सहभागी झालेल्या नागरिकांमध्ये गोंधळ उडाला. हे दोघेही शिवसेनेचे पदाधिकारी आहेत. परंतु व्ययक्तिक वादातून ही हाणामारी झाली असून त्याचा शिवसेनेशी काही संबंध नसल्याचे बोलले जात आहे.

ठाणे लोकसभा मतदारसंघाच्या जागेसाठी महायुतीकडून शिंदेंच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख नरेश म्हस्के यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी मासुंदा तलाव येथील शिवसेना जिल्हा शाखा ते टेंभीनाका अशी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत महायुतीचे नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ही मिरवणूक बाजारपेठेतून जात असताना, मिरवणुकीत सामील झालेले सिद्धेश अभंगे आणि अजय पासी या दोघांच्या समर्थकांमध्ये जोरदार हाणामारी झाली. अचानकपणे झालेल्या हाणामारीमुळे मिरवणुकीत सहभागी झालेले शिवसैनिक चक्रावले आणि त्यांच्यासह पोलिसांनी मध्यस्थी करत दोन्ही गटांना बाजुला केले.

सिद्धेश अभंगे आणि अजय पासी हे दोघेही युवा सेनेचे पदाधिकारी आहेत. हे दोघे एकेकाळी जिगरी मित्र होते. परंतु काही महिन्यांपूर्वी त्यांच्यात वाद झाले असून ते आता एकमेकांचे कट्टर विरोधक बनले आहेत. यामुळे वैयक्तिक वादातून ही हाणामारी झाली असून त्याचा शिवसेनेशी काही संबंध नसल्याचे बोलले जात आहे.



## यामिनी जाधव आणि रविंद्र वायकर यांच्याकडून अर्ज दाखल

मुंबई दक्षिण लोकसभा मतदार संघातून महायुतीच्या उमेदवार यामिनी जाधव यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला. मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदार संघातून महायुतीचे उमेदवार रविंद्र वायकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

## मनसे नेते अविनाश जाधव यांच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल

ठाणे – महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे ठाणे जिल्ह्याचे अध्यक्ष अविनाश जाधव यांच्यासह दोघांविरोधाल लोकमान्य टिळक (एल.टी.) मार्ग पोलिसांनी खंडणी, मारहाण व कट रचल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार सराफाकडे पाच कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. दरम्यान, सूड भावनेने आपल्याविरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आल्याचे अविनाश जाधव यांनी सांगितले. याबाबत त्यांनी टीव्ही ९ मराठीशी संवाद साधला.



अविनाश जाधव यांनी ५ कोटींचं खंडणी मागितल्याचा आरोप केला जातोय. यासंदर्भात त्यांच्याविरोधात गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. याबाबत बोलताना अविनाश जाधव म्हणाले, (पान २ वर)

### एफआयरमध्ये काय नोंदवलं?

सोन्याच्या दागिन्यांचे व्यापारी शैलेश जैन (५५) यांच्या तक्रारीनंतर वैभव ठक्कर व अविनाश जाधव यांच्याविरोधात भादंवि कलम ३८५, १४३, १४७, ३२३, १२० ब अंतर्गत पोलिसांनी गुन्हा दाखल केला. तक्रारीनुसार जैन यांनी ठक्करला झवेरी बाजार येथील जे. के. ज्वेलर्स या कार्यालयात हिशोबासाठी बोलावले होते. त्यावेळी जाधव त्यांचे सहकारी, अंगरक्षक व सहा ते सात व्यक्तींनी पोलिसांसमोर जैन यांचा मुलगा सौमिल याला मारहाण केली. यावेळी जाधव यांनी उचलून नेण्याची व नुकसान करण्याची धमकी देऊन जैन यांना पाच कोटी रुपयांसाठी धमकावल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

| लोकसभा मतदारसंघ | युतीचे उमेदवार | आघाडीचे उमेदवार |
|---|---|---|
| ■ मुंबई उत्तर मध्य | ॲडव्होकेट उज्ज्वल निकम (भाजपा) | वर्षा गायकवाड (काँग्रेस) |
| ■ उत्तर पश्चिम मुंबई | रवींद्र वायकर (शिंदे गट) | अमोल किर्तीकर (ठाकरे गट) |
| ■ दक्षिण मुंबईत | यामिनी जाधव (शिंदे गट) | अरविंद सावंत (ठाकरे गट) |
| ■ ठाणे | नरेश म्हस्के (शिंदे गट) | राजन विचारे (ठाकरे गट) |
| ■ भिवंडी | कपिल पाटील (भाजपा) | सुरेश म्हात्रे (शरद पवार गट) |
| ■ पालघर | डॉ. हेमंत सावरा (भाजपा) | भारती कामडी (ठाकरे गट) |

## संजय निरुपम यांनी अखेर काँग्रेसचा हात सोडला, मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश



संजय निरुपम यांनी अखेर काँग्रेसचा हात सोडत शिवसेनेत प्रवेश केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत संजय निरुपम आणि त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेचा झेंडा हाती घेतला. काँग्रेसच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यानंतर संजय निरुपम काय भूमिका घेणार याकडे होते सर्वांचे लक्ष होतं. दोन दिवसापूर्वी संजय निरुपम यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. अखेर संजय निरुपम यांनी काल (शुक्रवारी) शिवसेनेत प्रवेश केला.

## बनावट वाहन नोंदणी रॅकेटचा पर्दाफाश

**नवी मुंबई : विविध राज्यातून चोरण्यात आलेल्या ट्रक, हायवा, ट्रेलर यासारख्या वाहनांचे चेसी व इंजिन क्रमांकात फेरबदल करून त्यांची परराज्यात नोंदणी करून सदर वाहनांची महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात पुनर्नोंदणी करून या वाहनांची विक्री करणाऱ्या रॅकेटचा नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत गुन्हे शाखेने एकूण ५ कोटी ५० लाख रुपये किंमतीची २९ वाहने जप्त करून या रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या ९ आरोपींना अटक केली आहे. यात ३ आरटीओ अधिकाऱ्यांचा देखील समावेश आहे.**

या रॅकटमध्ये सहभागी असलेले आरोपी हे विविध राज्यातून ट्रक, हायवा, ट्रेलर यासारख्या वाहनांची चोरी करून त्याच्या चेसी व इंजिन क्रमांकात फेरबदल करून या वाहनांची अरुणाचल प्रदेश, हिमाचल प्रदेश, मणिपूर, नागालँड या राज्यात नोंदणी करत होते. त्यानंतर सदर टोळी बनावट कागदपत्रांच्या आधारे (पान २ वर)

### अमरावती, नागपूर आरटीओत पुनर्नोंदणी

या गुन्ह्यातील मुख्य आरोपी जावेद अब्दुल्लाने देशभरातील विविध राज्यातून चोरी करून आणलेले ट्रक, हायवा, ट्रेलर या वाहनांच्या चेसी व इंजिन क्रमांकात फेरबदल करून, वाहन निर्मिती करणाऱ्या कंपनीप्रमाणे ल्युमिनियमच्या इंजिन नंबरप्लेट बनवून घेतल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. तसेच जावेद अब्दुल्ला शेखने त्याच्या इतर साथीदारांच्या मदतीने गाडीवरील मूळ चेसी नंबर खोडून त्यावर नवीन दुसरा चेसी नंबर टाकून सदरच्या गाड्या या नागपूर, अमरावती व इतर आरटीओ कार्यालयात पुनर्नोंदणी करून घेतल्याचे आढळून आले आहे.

### वेगवेगळ्या पत्त्यांचे आधारकार्ड देखील तयार

मुख्य आरोपी जावेद अब्दुला शेख उर्फ मणीयारने स्वत:चे २ पॅनकार्ड बनविले असून त्याने त्याच्या साथीदाराचे वेगवेगळ्या पत्त्यांचे आधारकार्ड तयार करून काही वाहनांची आरटीओमध्ये पुनर्नोंदणी केल्याचे आढळून आले आहे. तसेच एकच मोबाईल नंबरचा वापर करून इतर वाहनमालकांच्या नावाची आरटीओमध्ये नोंदणी करून घेतल्याचे देखील निष्पन्न झाले आहे.

### फसवणुकीचे एकूण १० गुन्हे दाखल

या प्रकरणातील मुख्य आरोपी जावेद मणियार याच्याविरोधात नवी मुंबई, ठाणे, मिरा–भाईंदर, औरंगाबाद आयुक्तालय व धुळे येथे चोरी व फसवणुकीचे एकूण १० गुन्हे दाखल आहेत. जावेद अब्दुल्ला शेख याचा उत्तर प्रदेश व हरयाणा राज्यात चार गुन्ह्यांत सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच आरोपी रफीक मन्सुरी याच्यावर ३ गुन्हे दाखल आहेत.

# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## भटकत्या अतृप्त आत्म्यानिमित्त...

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक राजकीय पक्ष प्रतिस्पर्धी पक्षावर टीका करत असल्याचे दिसते यातच भाजप आणि काँग्रेसमध्ये टीका करण्याची चढाओढ लागली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे राहुल गांधी यांच्यावर टीका करतात. राहुल गांधीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करतात. सध्या तर हे असेच सुरू झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शरद पवारांना उद्देशून नाव न घेता अतृप्त भटकता आत्मा अशी टीका केली आहे. शरद पवार यांनी मोदींच्या टीकेला प्रत्युत्तर देताना म्हटले आहे की, यामध्ये आश्चर्य करण्यासारखे काहीच नाही. पत्रकारांशी संवाद साधताना पवार यांनी म्हटले आहे की, मी माजी पंतप्रधान पंडित जवाहर नेहरूंना पाहिले आहे. इंदिरा गांधी यांच्यापासून नंतरच्या सर्वच पंतप्रधानांची भाषणे ऐकली आहेत. परंतु अतृप्त आत्मासारखे शब्द पंतप्रधान नरेंद्र मोदी वापरतात तेव्हा त्यात काही आश्चर्य नसते. कारण मोदी यांच्या इतकी पंतप्रधान पदाची अप्रतिष्ठा कोणीच केलेली नाही. इंडिया आघाडीचे सरकार देशात आले तर पाच वर्षांत पाच पंतप्रधान होतील, अशी टीकाही मोदी यांनी सभांमधून चालवली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जनतेला उद्देशून सांगत आहेत की, इंडिया आघाडी सत्तेत आली तर पाच वर्षात पाच पंतप्रधान होतील. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बोलण्यात अतिशयोक्ती दिसत आहे. कारण दरवर्षाला पंतप्रधान करण्याएवढे इंडिया आघाडीतील सदस्य मूर्ख आणि बावळट नाहीत. कारण प्रत्येक पंतप्रधानाला पाच वर्ष पूर्ण काळ दिला तर जनतेचा विकास होऊ शकतो. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विरोधकावर जेवढे आरोप करता येईल तितके ते करत आहेत. परंतु हे आरोप जनतेला पटले पाहिजेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांचे सहकारी नेते राहुल गांधी आणि काँग्रेसवर जोरदार टीका करत असलेले दिसतात. यातून भाजपची मानसिकता समजते. सद्यस्थितीतील लोकसभा निवडणूक ही अंतिम असल्याप्रमाणे सर्व नेते एकमेकांवर जीवतोड टीका करत असल्याचे दिसतात. परंतु या टिकेतून जनतेला नवीन काय माहिती मिळते ते टीका करणारेच जाणोत.

शरद पवार यांनी राजकारणातील जुना किस्सा सांगितला आहे. ते म्हणतात,१९७७ मध्ये काँग्रेस पराभूत झाली. तेव्हा विरोधकांचा नेता कोण? असा प्रश्न होता. सर्वांनी एकत्रित येऊन मोरारजी देसाई यांची पंतप्रधानपदी निवड केली होती. आताही इंडिया आघाडीचे सरकार येणार असल्याने मतदान झाल्यावर सर्वजण एकत्र बसून एकमताने पंतप्रधान पदाचा निर्णय घेऊ,असे पवार म्हणाले. लोकसभा निवडणुकीमध्ये अपेक्षित जागा मिळाल्या नाहीत तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भाजपाकडून काही धोका होऊ शकतो का?, असा प्रश्न पत्रकारांनी उपस्थित केला असता शरद पवार म्हणाले, भाजपाची राजकीय नीती पाहता ते मित्र पक्षांना मोठे होऊ देत नाहीत. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत अपेक्षित निकाल लागला नाही तर भाजप त्यांना जागा दाखवून देईल. एकूणच शरद पवार यांनी भाजप पक्षाचे नीतिकता सांगितली आहे. यावरून सध्याच्या व आगामी राजकारणाची कल्पना येऊ शकते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शरद पवारांवर टीका करताना म्हटले आहे की, ते अतृप्त आत्मा आहेत. यावरून महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांत गदारोळ निर्माण झाला आहे. दुसऱ्याला अतृप्त आत्मा म्हणणारे स्वतःचे परीक्षण करत नाहीत असे वाटते. कारण सत्तेसाठी नेमके हपापलेले कोण आहे याचा शोध घेतला तर असे दिसून येते की, केंद्र सरकारमधील भाजपा विरोधकांवर मात करण्यासाठी वेगवेगळ्या कल्पना लढवत आहे आणि त्या अमलात आणत आहेत. कारण विरोधकांना आपल्या जाळ्यात ओढण्यासाठी केंद्र सरकारमधील भाजपाने राष्ट्रीय तपास यंत्रणांच्या कारवाईचा आधार घेतला आहे, असे सर्व विरोधक म्हणत आहेत. ज्या विरोधकांवर भाजपने आरोप केला आहे ते विरोधक सध्या भाजपमध्ये सामील होत आहेत किंवा भाजपच्या सहकारी पक्षात जात आहेत. महाराष्ट्रात एवढ्या नीच पातळीवरचे राजकारण आजपर्यंत झालेले नाही असे दिसते. तसेच निवडणुकीच्या रोख्यांबाबतचे व्यवहार पारदर्शक नसल्याचे दिसते. ही योजना केंद्रातील भाजपाने आणली होती. त्यानंतर ज्या कंपन्यांमध्ये आर्थिक अनियमितता झाली आहे. त्या कंपन्यांवर कारवाई करण्यात आली. ही कारवाई झाल्यानंतर भाजपाला निवडणूक रोख्यांचे दान मोठ्या प्रमाणात मिळाल्याचे दिसून आले. परंतु यावर सर्वोच्च न्यायालय शांत राहिले आहे. यावरून देशात भाजपची एकाधिकारशाही आणि मोदीशाही दिसून येत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शरद पवारांवर टीका करताना अतृप्त भटकता आत्मा असे म्हटले आहे. परंतु खरे तर गेल्या दहा वर्षात दिसून आले की, सत्तेसाठी हपापलेला अतृप्त भटका आत्मा नेमका कोण आहे. कारण भाजपाला व भाजपच्या प्रमुख नेत्यांना निवडणुकीशिवाय दुसरे काही सुचत नाही. निवडणूक जवळ आली असता भाजपचे नेते वेगवेगळ्या प्रकारे विरोधकावर टीका करतात, त्यांच्यावर राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या कारवाईची धमकी देतात. अशा प्रकारे कोणतीही निवडणूक जवळ आली तर भाजपचे कार्यकर्ते आणि नेते हे झपाटल्यासारखे कामाला लागतात. परंतु हे काम लोकविकासाचे नसते तर ते विरोधकांना कसे घाबरवायचे, कोणते कटकारस्थान रचायचे याबाबतचे असते. त्यामुळे राजकारणात अशा अतृप्त भटकत्या आत्म्यांची संख्या वाढली आहे. फक्त शरद पवारांनाच दोष देता येणार नाही. तर हे आत्मपरीक्षण स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही करणे आवश्यक आहे. दुसऱ्यावर टीका केल्यामुळे आपण मोठे होऊ असा जो गोड गैरसमज नरेंद्र मोदींचा झाला आहे तो त्यांनी बंद करावा ही अपेक्षा.

दुसऱ्याला अतृप्त भटकता आत्मा हिनवणे ही नेमकी संस्कृती कोणती आहे ? कारण महाराष्ट्रात किंवा देशात अशा प्रकारचे विधान यापूर्वी कोणत्याही पंतप्रधानाने केलेले नव्हते आणि ते करणेही शक्य नाही. विशेष म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्या पक्षात आहेत त्या पक्षांनी केलेल्या काही घडामोडी पाहता असे दिसून येते की, सध्या अतृप्त भटकत्या आत्म्यांची गर्दी वाढली आहे आणि ती भाजपनेच वाढवली आहे. कारण भाजपने महाराष्ट्रातील दोन प्रादेशिक पक्ष फोडून सर्व राजकारण अस्थिर केले आहे. त्यामुळे भटकते अतृप्त आत्मे राजकारणात हिंडत आहेत. सत्तेसाठी हपापलेले राजकीय पक्ष नीच पातळीवर जात आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी दुसऱ्याला अतृप्त भटकता आत्मा म्हणतात, हे योग्य नाही.

# महायुतीचे उमेदवार खासदार डॉ. श्रीकांत शिंदेंना वारकरी संप्रदायाचे आशीर्वाद!

**कल्याण : कल्याण लोकसभेचे खासदार आणि महायुतीचे उमेदवार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी आपला उमेदवारी अर्ज भरला. यावेळी वारकरी संप्रदायातील ह. भ. प. आचार्य प्रल्हाद महाराज शास्त्री यांची प्रमुख उपस्थिती होती. यामुळे खासदार श्रीकांत शिंदे यांना वारकरी संप्रदायाबद्दल असलेला आदर पुन्हा एकदा दिसून आला.**

समाजाला दिशा देणाऱ्या आणि जगण्याचा मार्ग दाखवणाऱ्या वारकरी संप्रदायाबद्दल खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना असलेला आदर आणि जिव्हाळा, यामुळेच कल्याण लोकसभा क्षेत्राला दिशा देणाऱ्या कल्याण शीळ रस्त्याला ह. भ. प. सावळाराम महाराज म्हात्रे यांचे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच सावळाराम महाराजांचे स्मारक उभारण्यासोबतच कल्याण ग्रामीण भागात वारकरी भवन उभारण्यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी पुढाकार घेतला. इतकेच नव्हे, तर देशातील सर्वात मोठा



कीर्तन महोत्सव आणि रिंगण सोहळा खासदार शिंदे यांनी अंबरनाथ तालुक्यातील मलंगगड परिसरात आयोजित केला. या महोत्सवाला देशभरातून आलेल्या वारकऱ्यांचा खासदार शिंदे यांनी सन्मान केला. वारीप्रमाणेच आयोजित केलेला रिंगण सोहळा तर डोळ्यांचे पारणे फेडणारा होता. या संपूर्ण सोहळ्यात खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी वारकऱ्यांप्रमाणेच सहभाग घेतला होता.

आता त्याहीपुढे जात खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना वारकरी संप्रदायाला मान देण्यात आला. कुंभार्ली येथील वसुधैव कुटुंबकम अध्यात्मिक संस्थानाचे ह. भ. प. आचार्य प्रल्हाद महाराज शास्त्री यांना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी अर्ज भरताना निमंत्रित केले आणि त्यांच्या मुख्य उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज सादर केला. त्यामुळे वारकरी संप्रदायासाठी केलेले कार्य आणि त्यांना दिलेला आदर-सन्मान यामुळे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पाठीशी यांना वारकरी संप्रदायाचे आशीर्वाद असून ते यंदा तिसऱ्यांदा विजयाचे तोरण नक्कीच बांधतील, असा विश्वास वारकरी संप्रदायाने व्यक्त केला आहे.

# कल्याण लोकसभा मतदारसंघात ठाकरे गटाचे रमेश जाधव यांचा उमेदवारी अर्ज

**शुक्रवारी ठाकरे गटातील कल्याणचे माजी महापौर रमेश जाधव यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने खळबळ उडाली आहे.**

कल्याण - कल्याण लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचा उमेदवार म्हणून उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी डोंबिवलीतील वैशाली दरेकर यांची उमेदवारी जाहीर केली असताना, शुक्रवारी ठाकरे गटातील कल्याणचे माजी महापौर रमेश जाधव यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने खळबळ उडाली आहे.

रमेश जाधव यांनी बंडोखोरी केली असल्याची चर्चा आहे. पण, जाधव यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. आपणास मातोश्रीवरून संपर्क साधण्यात आला. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आपणास कल्याण लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची सूचना केली. त्या सूचनेचे पालन करून आपण उमेदवारी अर्ज भरत आहोत, असे स्पष्ट केले आणि बंडखोरीच्या चर्चेला पूर्णविराम दिला. महाविकास आघाडीच्या उमेदवार वैशाली दरेकर यांच्या प्रचारात



आघाडीवर असलेले कल्याण उपशहर जिल्हा संघटक हर्षवर्धन पालांडे आणि इतर शिवसैनिक त्यांच्या सोबत होते. महाविकास आघाडीच्या उमेदवार दरेकर यांच्या प्रचाराचा झंझावत सुरू असताना रमेश जाधव यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून अर्ज दाखल केल्याने विविध चर्चांना उधाण आले आहे.

उमेदवारी अर्ज छाननी होण्यापूर्वी कोणताही धोका नको म्हणून पर्यायी व्यवस्था म्हणून जाधव यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला आहे, असे ठाकरे गटातील एका ज्येष्ठ पदाधिकाऱ्याने सांगितले. छाननीची प्रक्रिया पार पडली आणि उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी जाधव उमेदवारी अर्ज मागे घेतील, असे या पदाधिकाऱ्याने सांगितले. रमेश जाधव यांची कल्याण शहराचे विधानसभेत नेतृत्व करण्याची अनेक वर्षांची इच्छा आहे.

## बिचुकले उमेदवार

बिग बॉस कार्यक्रमातील सहभागी अभिनेते अभिजीत बिचुकले यांनी शुक्रवारी कल्याण लोकसभा मतदारसंघात अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला. संविधानाचे संरक्षण, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आपण काही विधायक सूचना केल्या होत्या, त्या सूचनांचे पालन किंवा त्या विषयावर त्यांनी आपणास कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिला नाही. स्वार्थासाठी ही मंडळी देशहिताचे कारण देत राजकारण देत आहेत, या मंडळींच्या स्वार्थीपणाला धडा शिकविण्यासाठी आपण सातारा आणि कल्याण लोकसभा मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढवित आहोत, असे बिचकुले यांनी सांगितले.

## अज्ञात चोरट्याने बुलेट दुचाकी लांबवली

ठाणे - राहत्या सोसायटीच्या आवारात पार्किंग केलेली दुचाकी बुलेट अज्ञात चोरट्याने लंबावल्याची घटना बुधवारी(ता-१ मे) रोजी सकाळी उघडकीस आली. तक्रारदार सचिन नारायण कदम(४२) यांनी दुचाकी बुलेटचा शोध घेऊन नौपाडा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा गुरुवारी(ता-२ मे) रोजी दाखल केला. तक्रारदार सचिन नारायण कदम(४२) रा. फ्लॅट क्र. २०१, ए विंग, मंगला प्रसाद कं. सहकारी सोसा, गणेशवाडी पाचपाखाडी, ठाणे येथे राहण्यास असून त्यांच्याकडे बुलेट दुचाकी आहे. बुलेट गाडी तक्रारदार यांचा मेव्हणा नामे रविंद्र धोडींराम सातपुते रा. रुम नं.१०९, मैत्री टॉवर, लुईसवाडी, पाचपाखाडी ठाणे यांच्या नावे असून ती तक्रारदार वापरतात. बुधवारी ३० मे रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास सोसायटीच्या आवारात नेहमी प्रमाणे पार्क केली आणि १ मे गुरुवारी सकाळी नाष्टा आणण्यासाठी गाडी शोधली असता बुलेट आढळलीच नाही बुलेटचा शोध घेऊन न सापडल्याने नौपाडा पोलीस ठाण्यात बुलेट चोरी प्रकरणी अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा नोंदविला.

# कपिल पाटील यांच्या जनआशीर्वाद यात्रेला उसळला हजारोंचा जनसागर!

**भिवंडी - भिवंडी लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार कपिल पाटील यांनी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी काढलेल्या जनआशीर्वाद यात्रेला हजारो नागरिकांचा जनसागर उसळला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत महायुतीने केलेल्या शक्तीप्रदर्शनाने गर्दीचे सर्व जुने विक्रम मोडले गेले. तर जय श्रीराम व मोदी मोदीच्या गजरामुळे संपूर्ण भिवंडी शहर महायुतीमय झाल्याचे पाहावयास मिळाले. भिवंडी मतदारसंघातून कपिल पाटील हे मुंबई महानगर क्षेत्रात विक्रमी मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.**

## भिवंडीतत महायुतीचे उमेदवार कपिल पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल





मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भिवंडी येथील महायुतीचे उमेदवार कपिल पाटील यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे आज उमेदवारी अर्ज दाखल केला. या वेळी भाजपाचे आमदार किसन कथोरे, महेश चौघुले,संजय केळकर, निरंजन डावखरे, रमेश पाटील, ज्ञानेश्वर म्हात्रे, शिवसेनेचे आमदार शांताराम मोरे, विश्वनाथ भोईर, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार दौलत दरोडा, ज्येष्ठ नेते शिवसेनेचे उपनेते प्रकाश पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमोद हिंदुराव, रिपब्लिकन पक्षाचे नेते संजय गायकवाड, कुणबी सेनेचे अध्यक्ष विश्वनाथ पाटील, श्रमजीवी संघटनेचे अशोक साप्ते, माजी आमदार नरेंद्र पवार, मनसेचे माजी आमदार प्रकाश भोईर, संतोष शेट्टी, सुभाष माने आदी उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून जनआशीर्वाद यात्रेला सुरुवात झाली. ढोल, झांज आणि ताशांच्या गजराने वातावरण दुमदुमून गेले होते. भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपब्लिकन पक्ष, श्रमजीवी संघटना, कुणबी सेनेच्या ध्वजांबरोबर जय श्रीराम व मोदी मोदी गजर सुरू होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हजारो नागरिकांना संबोधित केले. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, या यात्रेला मिळालेल्या प्रतिसादातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याला मिळालेली जनतेची पसंती दिसून येत आहे. आताची लोकसभा निवडणूक ही देशासाठी महत्वाची आहे. देशाचे भविष्य घडविणारी ही निवडणूक आहे. नरेंद्र मोदींनी रोटी, कपडा और मकान दिले. परंतु, आता काँग्रेसचे नेते तुमची अर्धी प्रॉपर्टी सरकारजमा करण्याचा प्रयत्न करीत आहेत. काँग्रेसचा हा प्रयत्न हाणून पाडावा.'' भिवंडीत झालेली ही अभूतपूर्व गर्दी पाहून ऋएमएमआरडीए' क्षेत्रातून सर्वाधिक मतांनी कपिल पाटील निवडून येतील, याची खात्री होत आहे. यंदाच्या लोकसभा निवडणुकीतून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी कपिल पाटील यांना मतदान करून लोकसभेत पाठवावे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाचे इंजिन देशाला प्रगतीकडे नेणारे आहे. या इंजिनाला भिवंडीतून साथ द्यावी. तर २६ पक्षांची खिचडी असलेल्या पक्षांकडून प्रत्येक जण मीच इंजिन असल्याचे सांगत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २५ कोटी गरीबांची प्रगती केली आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. ज्येष्ठ वकील उज्वल निकम यांच्यासारख्या देशभक्ताला उमेदवारी दिली. मात्र, काँग्रेसकडून उज्वल निकमांनी देशद्रोही अजमल कसाबची बदनामी केली, असा आरोप केला जात असल्याकडे देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष वेधले.

## निवडणुकीत विरोधक चारीमुंड्या चित होतील

**(पान १ वरून)** यावेळी महायुतीचे नेते उपस्थित होते. नरेंद्र मोदींना पुन्हा पंतप्रधान करण्याचा संकल्प लोकांनी केला आहे. तुमचा ठाणेकर या राज्याचा मुख्यमंत्री आहे. केवळ ठाण्यातच नाही तर संपूर्ण राज्यात कधी नव्हे इतकी विकास कामे केली आहेत. आपले सरकार येण्यापूर्वी सणांवर बंदी होती. घरात बसून सरकार चालवता येत नाही. फेसबुक लाईव्हने सरकार चालत नाही, अशी टीका मुख्यमंत्र्यांनी उबाठावर केली. अहंकारामुळे राज्य अधोगतीला चालले होते. याविरोधात आपण उठाव केला. बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघेंच्या विचारांचे सरकार आपण स्थापन केले. मागील दोन वर्षात राज्यात प्रचंड काम झाले आहे. हे काम मतदारांपर्यंत पोहोचवायचे आहे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी कार्यकर्त्यांना केले. आजची प्रचंड गर्दी पाहता नरेश म्हस्के यांच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले आहे. नरेश म्हस्के यांना मत म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मत आहे. यंदाची निवडणूक ही विकासाची निवडणूक असून देशाला पुढे नेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. त्यांना डोळ्यासमोर पराभव दिसत असल्याने आता पंतप्रधान नरेंद्र मोदींविरोधात नवी टुम काढली आहे. मोदी पुन्हा पंतप्रधान झाले तर संविधान बदलणार असा आरोप करत आहेत. मात्र जोवर चंद्र आणि सूर्य आहेत तोवर बाबासाहेबांचे संविधान कोणी बदलणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

## मनसे नेते अविनाश जाधव यांच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल

**(पान १ वरून)** मी परवा हुतात्मा चौकात होतो. तेव्हा वैभव नावाच्या मुलाचा फोन आला. मी आणि वरिष्ठ अधिकारी तिथे गेलो. खरंच खालून लॉक केला होता. आम्ही वर गेल्यानंतर मालक वाईट भाषेत बोलायला लागला. तिथे माझा आणि त्यांच्यात थोडासा वाद झाला. हे एवढंच प्रकरण आहे.

माझ्याबरोबर वरिष्ठ पोलीस वगैरे होते. त्यांच्यासमोर मी खंडणी मागेन का? पोलीसच एफआयरमध्ये म्हणत आहेत की पोलिसांसमोर अविनाश जाधवने मारहाण केली, पोलिसांसमोर कोणी खंडणी मागतं का? या गुन्ह्याप्रकरणी आम्ही हायकोर्टात गेलो आहोत, आम्हाला स्टेसुद्धा मिळेल. हा फक्त बदनामीसाठी दाखल केलेला गुन्हा आहे. माझा याच्याशी काही संबंध नाही. फक्त कोणाला तरी वाचवायला गेलो. त्यानंतर एका अब्जाधिश गोल्डमाफियाला मदत करण्यात आलेली आहे. राजकीय दबावापोटी माझ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा बदनामीचा कट आहे, असंही ते म्हणाले.

## बनावट वाहन नोंदणी रॅकेटचा पर्दाफाश

**(पान १ वरून)** त्याच वाहनांचे एनओसी प्राप्त करून त्याची महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात पुनर्नोंदणी करून सदर वाहनांची लाखो रुपयांमध्ये विक्री करत होते. गत मार्च महिन्यामध्ये अशा प्रकारे बनावटगिरी करून विकलेले दोन ट्रक एपीएमसी मार्केटमध्ये आले असताना, नवी मुंबई पोलिसांच्या वाहन चोरी शोध पथकाने हे दोन ट्रक ताब्यात घेतले होते.

या गुन्ह्यात आंतरराज्य टोळीचा समावेश असल्याचे निदर्शनास आल्यामुळे गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अमित काळे यांच्या आदेशानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चांदेकर, पोलीस उपनिरीक्षक संजय रेड्डी, प्रताप देसाई यांचे विशेष तपास पथक तयार करण्यात आले होते. या पथकाने केलेल्या तपासात जावेद अब्दुला शेख उर्फ मनियार हा या गुन्ह्यातील मुख्य आरोपी असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली. त्यानंतर पोलिसांनी आरोपी जावेद याला सहकार्य करणाऱ्या ५ आरोपींना नागपूर, अमरावती, धुळे, बुलढाणा, सुरत, औरंगाबाद या भागात शोध घेऊन त्यांना देखील या गुन्ह्यात अटक केली आहे.

पोलिसांनी केलेल्या तपासात अमरावती येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील एक सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, एक मोटार वाहन निरीक्षक व एक सहायक वाहन निरीक्षक यांनी आरोपींशी संगनमत करून वाहने समक्ष हजर नसताना त्यांची पुर्ननोंदणीची कार्यवाही केल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे या तिघांना देखील अटक करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पोलिसांनी नागपूर येथील आरटीओ एजंटला देखील अटक केली आहे.

## ऐन उन्हाळ्यात कलिंगड विक्री थंड

**(पान १ वरून)** तेच एप्रिल मध्ये १५ ते १६ रुपये बाजारभाव होते. एपीएमसीत आता आंब्याची आवक जास्त होत असून इतर फळांची मागणी कमी आहे. बहुतांशी ग्राहक आंबा खरेदीकडे वळला आहे. त्यामुळे बाजारात कलिंगडला म्हणावी तशी मागणी नाही.

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

### Public Notice

Service Request Number : THN/01461/18/24
Inquiry/case No. : ACC/II//273/2024
Name of the Trust : ONE HELP FOUNDATION

**Address of the Trust :** FLAT NO. 304, HOUSE NO. 1674, SHRI NIWAS BUILDNG, JUINAGAR GAON, NERUL, NAVI MUMBAI, THANE, THANE, THANE

**Name of the Applicant :** MR. LAXMAN MALLU VHANKHANDE

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 03/05/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

### Public Notice

Service Request Number : THN/00620/18/24
Inquiry/case No. : ACC/II//2/143/2024
Name of the Trust : SWAMI NIGOMANAND SARASWATI ADHYATMIK MANAV SAMAJ KALYAN SEVA TRUST

**Address of the Trust :** H. NO. 30, FLAT : 106, 1ST FLOOR, VASANT PATIL, RESIDENCY, NEW KANERI, B/H, CITIZEN HOSPITAL, BHIWANDI, THANE, THANE, THANE

**Name of the Applicant :** MR. NIGOMANAND GURUPAD HALDER

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 02/05/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

## भारतीय आर्थिक/सांख्यिकी सेवा परीक्षा

- जागा : ४८ जागा
- IES भारतीय आर्थिक सेवा परीक्षा
- ISS भारतीय सांख्यिकी सेवा परीक्षा
- शैक्षणिक पात्रता:
- IES : पदव्युत्तर पदवी. (Economics/Applied Economics/ Business Economics/Econometrics)

ISS: nXdr (Statistics/Mathematical Statistics/Applied Statistics) किंवा पदव्युत्तर पदवी (Statistics/ Mathematical Statistics/Applied Statistics)
वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी २१ ते ३० वर्षे, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
- Fee: General/OBC: 200/- SC/ ST/PWD/महिला:फी नाही
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० एप्रिल २०२४
- परीक्षा: २१ जून २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://upsc.gov.in/

## मुंबई नेव्हल डॉकयार्ड

- पदाचे नाव: अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी)

१ इलेक्ट्रिशियन
२ इलेक्ट्रोप्लेटर
३ फिटर
४ फाउंड्रीमन
५ मेकॅनिक
६ इन्स्ट्रुमेंट मेकॅनिक
७ मशीनिस्ट
८ चचढच्
९ पेंटर
१० पॅटर्न मेकर
११ पाईप फिटर
१२ इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक
१३ मेकॅनिक Reff.
१४ शीट मेटल वर्कर ०३
१५ शिपराईट (Wood) १८
१६ टेलर (G) ०३
१७ वेल्डर (G E) २०
१८ मेसन (BC) ०८
१९ I CTSM² ०३
२० शिपराईट (Steel) १६
२१ रिगर १२
२२ फोर्जर हीट ट्रीटर ०१

- शैक्षणिक पात्रता:

रिगर: ०८वी उत्तीर्ण
फोर्जर हीट ट्रीटर: १०वी उत्तीर्ण
उर्वरित पदे: संबंधित ट्रेड मध्ये ITI (NCVT/SCVT)

- शारीरिक पात्रता: उंची छाती वजन १५० सेमी फूगवून ०५ सेमी जास्त ४५

वयाची अट: किमान १४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट

- अर्ज करण्याची शेवटची तारीख: १० मे २०२४
- परीक्षा: मे/जून २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.indiannavy.nic.in/

## केंद्रीय सशस्त्र पोलीस दल

- परीक्षेचे नाव: संयुक्त केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (असिस्टंट कमांडंट) परीक्षा २०२४
- जागा : ५०६
- पदाचे नाव: असिस्टंट कमांडंट

1 BSF
2 CRPF
3 CISF
4 ITBP
5 SSB

- शैक्षणिक पात्रता: कोणत्याही शाखेतील पदवी.
- शारीरिक पात्रता:

पुरुष/महिला उंची छाती वजन
पुरुष १६५ से.मी. ८१-८६ से.मी. ५० ज्ञस
महिला १५७ से.मी. - ४६ ज्ञस

- वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी २० ते २५ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
- Fee: General/OBC: 200/- SC/ ST/महिला: फी नाही
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: १४ मे २०२४
- लेखी परीक्षा: ०४ ऑगस्ट २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.mha.gov.in/en/about-us/central-armed-police-forces

## स्टाफ सिलेक्शन कमिशन

- परीक्षेचे नाव: संयुक्त उच्च माध्यमिक (१०+२) स्तर (CHSL) परीक्षा २०२४
- पदाचे नाव तपशील:

१ कनिष्ठ विभाग लिपिक / कनिष्ठ सचिवालय सहाय्यक
२ डेटा एंट्री ऑपरेटर
३ डेटा एंट्री ऑपरेटर

- शैक्षणिक पात्रता: १२वी उत्तीर्ण.
- वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते २७ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
- Fee: General/OBC: 100/- SC/ST/PWD/ ExSM²/महिला: फी नाही
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०७ मे २०२४
- परीक्षा:Tier-I: जून-जुलै २०२४

Tier-II: नंतर सूचित केले जाईल.

- अधिकृत वेबसाईट: https://ssc.nic.in/

## भारतीय सैन्य

- कोर्सचे नाव: 140th टेक्निकल पदवीधर कोर्स जानेवारी २०२५
- पदाचे नाव: TGC
- शैक्षणिक पात्रता: संबंधित विषयात इंजिनिअरिंग पदवी किंवा इंजिनिअरिंगच्या शेवटच्या वर्षातील उमेदवार.
- वयाची अट: जन्म ०२ जानेवारी १९९८ ते ०१ जानेवारी २००५ दरम्यान.
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- फी : फी नाही.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०९ मे २०२४
- अधिकृत संकेतस्थळ https://www.indianarmy.nic.in/

## आर्ममेंट रिसर्च डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट

- जागा : २०
- ज्युनियर रिसर्च फेलो
- रिसर्च असोसिएट
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: प्रथम श्रेणी BE/B. Tech+NET/GATE किंवा प्रथम श्रेणी M.Sc+NET
पद क्र.२: (i) PhD (ii) ME/M.Tech (iii) ०३ वर्षे अनुभव
वयाची अट: २८ वर्षांपर्यंत SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: पुणे
- : फी नाही.
- अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Director, Armament Research Development Establishment (ARDE), Armament Post, Pashan, Pune- 411021
- अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३१ मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.drdo.gov.in/drdo/labs-and-establishments/armament-research-development-establishment-arde

## दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

- Grand Total : २७०७ जागा (८६१+१११३+७३३)
- P (SECR) अप्रेंटिस पदाच्या ८६१ जागांसाठी भरती (नागपूर)
- P (SECR) अप्रेंटिस पदाच्या १११३ जागांसाठी भरती (रायपूर)
- P (SECR) अप्रेंटिस पदाच्या ७३३ जागांसाठी भरती (बिलासपूर)
- जाहिरात क्र.: P/NGP/SAS/२०२४/१६
- आस्थापना क्र.: E०५२०२७०२६९५ E०५२०२७०२४९४
- Total: ८६१ जागा
- पदाचे नाव: अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी)
- शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI
- वयाची अट: १० एप्रिल २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: नागपूर
- फी : फी नाही.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०९ मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://secr.indianrailways.gov.in/

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

- जागा : ५३४७
- पदाचे नाव: विद्युत सहाय्यक
- शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.
- वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
- फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

## हिंदुस्थान उर्वरक आणि रसायन लिमिटेड

- जागा : ८०

१ मॅनेजर / (L2)
२ इंजिनिअर/ (L-1)
३ ऑफिसर/ (L-1)
४ चीफ मॅनेजर/ (L-3)
५ असिस्टंट मॅनेजर/(L1) FTC
६ ऑफिसर/(L1) FTC

- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी/B.Sc. (-gri)+ M.Sc./CA/CMA (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी/ MBA/CA/CMA (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: (i) CA/CMA/ PGDM²/ MBA (Finance) (ii) १९ वर्षे अनुभव
पद क्र.५: (i) ६०% गुणांसह पदवी/PG डिप्लोमा (Communication/ -dvertising Communication Management/Public Relations/ Mass Communication/ Journalism) किंवा MBA/MSW किंवा B.Sc. (Agri)+ M.Sc.(Agriculture) किंवा BSc.Agri/B.Tech+ MBA/PGDBM² (ii) ०७ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) LLB (ii) ०५ वर्षे अनुभव

- वयाची अट: २० मे २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

पद क्र.१: ४० वर्षांपर्यंत
पद क्र.२: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.३: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.४: ४७ वर्षांपर्यंत
पद क्र.५: ४५ वर्षांपर्यंत
पद क्र.६: ३५ वर्षांपर्यंत

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- फी : फी नाही.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://hurl.net.in/

# अपुऱ्या मिठाच्या सेवनाचा तुमच्या झोपेवर होतो थेट परिणाम?

शाकाहारी असो किंवा मांसाहारी, पदार्थाला चव देणारं काम हे चिमूटभर मीठचं करते. मिठाचे स्वयंपाकघरात स्थान जितके महत्त्वाचे आहे तितकेच ते शरीराच्या क्रिया योग्य प्रकारे होण्यासाठीसुद्धा आवश्यक आहे. मात्र, चवीला चांगले लागते म्हणून आहारात मीठ जास्त घालणे किंवा आरोग्यासाठी मीठ घातक म्हणून मिठाचे सेवन कमी करणे या दोन्ही गोष्टींचा आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.
तुम्हीसुद्धा आहारात मीठ कमी करण्याचा प्रयत्न करीत आहात? तर याचे दुष्परिणामसुद्धा एकदा या लेखातून नक्की वाचा.
हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधीचे आरोग्यतज्ज्ञ डॉक्टर जेम्स डिनिकोलँटोनियो चेतावणी देतात की, कमी मिठाचे सेवन तुमच्या झोपेवर आणि हाडांच्या ताकदीवर नकारात्मक परिणाम करू शकतात. डॉक्टरांनी एका रीलमध्ये नमूद केले आहे की, सहानुभूतीशील मज्जासंस्था सक्रिय झाल्यामुळे कमी मीठयुक्त आहार घेतलेल्या लोकांची झोप खराब झाली आहे. क्लिनिकल दृष्टिकोनातून पाहायला गेल्यास सहानुभूतीशील मज्जासंस्थेतील ही वाढ खरं तर ताण आहे आणि याचा झोपेवर परिणाम होऊ शकतो. तसेच यामुळे शरीरातील कमी सोडियममुळे हाडांचे आरोग्य बिघडते. कारण हाडांमधील कॅल्शियम आणि मॅग्नेशियम यांसारखी आवश्यक खनिजे कमी होतात.
तर या संबंधित अधिक जाणून घेण्यासाठी द इंडियन एक्स्प्रेसने बंगळुरू येथील स्पर्श हॉस्पिटलचे गॅस्ट्रोएन्टेरोलॉजीचे वरिष्ठ सल्लागार डॉक्टर प्रणव होन्नावरा श्रीनिवासन यांच्याशी चर्चा केली. तेव्हा डॉक्टर म्हणाले की, शरीरातील द्रव आणि इलेक्ट्रोलाइट्सचे होमिओस्टॅसिस राखण्यात सोडियम महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. कमी मिठाचे सेवन हे संतुलन विस्कळीत करू शकते. संभाव्यतः झोपेच्या चक्राच्या नैसर्गिक प्रक्रियेवरसुद्धा परिणाम करू शकते. संशोधन असे सूचित करते की, सोडियम पातळी कॉर्टिसॉल (एक तणाव नियंत्रण करणारा हार्मोन) आणि ड्रेनालाईनसारख्या तणावाच्या संप्रेरकांवर प्रभाव पाडते; ज्यामुळे झोपेची पद्धत बदलू शकते. सोडियम झोपेचे नियमन करणाऱ्या न्यूरोट्रांसमीटर, सेरोटोनिन, ओरेक्सिनवरसुद्धा परिणाम करतो. शरीरातील अपुरी मीठ पातळी या न्यूरोट्रांसमीटरच्या सामान्य कार्यामध्ये व्यत्यय आणू शकते, ज्यामुळे गाढ, पुरेशी झोप मिळविण्यात अडचणी येतात.

### मिठाचे सेवन आणि हाडांचे आरोग्य -

मिठात सोडियम असते, जे कॅल्शियम शोषून हाडांमध्ये टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असते. कमी सोडियम आहारामुळे कॅल्शियमचे प्रमाण कमी होऊ शकते, ज्यामुळे ऑस्टिओपोरोसिस आणि हाडे फ्रॅक्चरचा धोका वाढतो. विशेषत: रजोनिवृत्तीनंतरच्या महिलांमध्ये हे प्रमाण जास्त आढळून येते, असे डॉक्टर प्रणव श्रीनिवासन सांगतात. अपुऱ्या मिठाच्या सेवनामुळे कॅल्शियमचे नकारात्मक संतुलन होऊ शकते, ज्यामुळे शरीर आवश्यक रक्त पातळी राखण्यासाठी हाडांमधून कॅल्शियम बाहेर टाकू शकते; ज्यामुळे हाडांची रचना कमकुवत होते.

### मिठाच्या सेवनाची काही मार्गदर्शक तत्त्वे :-

फायदे आणि तोटे संतुलित करणे - जागतिक आरोग्य संघटनेने (थकज्ञ) उच्च रक्तदाब आणि हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी रोग टाळण्यासाठी दररोज पाच ग्रॅमपेक्षा कमी मीठ




खाण्याची शिफारस केली आहे. पण वय, आरोग्यस्थिती आणि जीवनशैलीच्या घटकांवर आधारित वैयक्तिक गरजा बदलू शकतात, असे डॉक्टर प्रणव श्रीनिवासन स्पष्ट करतात. इष्टतम पातळी - मिठाचे संतुलित सेवन राखणे महत्त्वाचे आहे, जे शिफारस केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त किंवा शारीरिक कार्यांसाठी आवश्यक असलेल्या मर्यादेपेक्षा कमी नाही. त्यामुळे मिठाच्या सेवनाची इष्टतम पातळी चांगली राहते आणि शांत झोप लागते.
कोणत्या व्यक्तींना कमी मिठाच्या आहारामुळे शरीरावर परिणाम होण्याची अधिक शक्यता असते?
मूत्रपिंडाचे विकार, एडिसन रोग किंवा काही लघवीचे प्रमाण वाढवणारी औषधे (पोटॅशियम-स्पेअरिंग लघवीचे प्रमाण वाढवणारा पदार्थ) वापरणाऱ्या व्यक्तींना जास्त मीठ घेणे आवश्यक असू शकते. वृद्ध आणि क्रीडापटू ज्यांच्या घामाने शरीरातून सोडियमचे प्रमाण कमी होते, त्यांनीही मिठाचे सेवन केलं पाहिजे. त्यांच्या सोडियम पातळीचे बारकाईने निरीक्षण करून हायपोनेट्रेमिया (असामान्यपणे कमी सोडियम पातळी) टाळण्यासाठी आवश्यकतेनुसार आहार समायोजित करण्यासाठी आरोग्य सेवा प्रदात्यांचा सल्ला घ्यावा, असे डॉक्टर प्रणव श्रीनिवासन म्हणतात.

### आहारात मिठाचं प्रमाण कोणी कमी करायचंय?

कमी मिठाचा आहार सामान्य लोकांसाठी हानिकारक मानला जात असला तरीही उच्च रक्तदाब, हार्ट फेल्यूअर किंवा मूत्रपिंडाचा आजार असलेल्या रुग्णांना मात्र कमी मीठ आहाराचे सेवन करण्याच्या सल्ला दिला जातो. या रुग्णांसाठी पोटॅशियम क्लोराईड, औषधी वनस्पती आणि मसाल्यांसारखे पर्याय सोडियमचे सेवन न वाढवता अन्नाची चव वाढवण्यासाठी वापरले जाऊ शकतात. याव्यतिरिक्त पोटॅशियम आणि मॅग्नेशियमसारख्या खनिजांचे संतुलित सेवनदेखील सोडियमच्या कमी वापरामुळे आरोग्यावर होणारे परिणाम व्यवस्थापित करण्यात मदत करू शकते; असे डॉक्टर प्रणव श्रीनिवासन म्हणतात.

# भुवीची कमाल


## राजस्थानचा झंझावात रोखला; रोमांचक सामन्यात एका धावेने विजय



आयपीएलच्या १७व्या हंगामातील ५०वा सामनाहैदराबादच्या राजीव गांधी इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडियमवर पार पडला. या सामन्यात सनरायझर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स आमनेसामने आले होते. ज्यामध्ये सनरायझर्स हैदराबादने भुवनेश्वर कुमारच्या शानदार गोलंदाजीच्या जोरावर राजस्थान रॉयल्सवर एका धावेने शानदार विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना हैदराबादने नितीश रेड्डी आणि ट्रॅव्हिस हेडच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर राजस्थान समोर विजयासाठी २०२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. मात्र प्रत्युत्तरात राजस्थान संघाने यशस्वी-रियानच्या शतकी भागीदारीच्या जोरावर ७ बाद २०० धावाच करु शकला.
हैदराबादने दिलेल्या २०२ लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सची सुरुवात खूपच खराब झाली कारण संघाने एक धावेवर जोस बटलर (०) आणि कर्णधार संजू सॅमसनचे (०) विकेट गमावले. यशस्वी जैस्वाल आणि रियान पराग यांच्यातील १३३ धावांच्या भागीदारीने आरआरला विजयाच्या जवळ आणले होते, तरीही संघ विजयाची नोंद करू शकला नाही. राजस्थानला शेवटच्या चेंडूवर दोन धावांची गरज होती, पण भुवनेश्वरने रोव्हमन पॉवेलला (२७) बाद करून हैदराबादला विजय मिळवून दिला.
या सामन्यात भुवनेश्वर कुमारने तीन विकेट घेत आपल्या संघाला विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. तत्पुर्वी यशस्वी जैस्वालने ४० चेंडूत ६७ धावा केल्या, ज्यात त्याने ७ चौकार आणि २ षटकार मारले. रियान परागने ४९ चेंडूत ७७ धावांची शानदार खेळी खेळली, ज्यात त्याने ८ चौकार आणि ४ षटकार ठोकले. या विजयासह हैदराबादने दोन महत्त्वाचे गुण घेतले, तर राजस्थानची प्लेऑफमध्ये पोहोचण्याची प्रतीक्षा वाढली.
तत्पूर्वी, सनरायझर्स हैदराबादचा कर्णधार पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, मात्र संघाची सुरुवात चांगली झाली नाही आणि आवेश खानने अभिषेक शर्माला बाद करून राजस्थानला चांगली सुरुवात करून दिली. पुढच्याच षटकात अनमोलप्रीत सिंग संदीप शर्माचा बळी ठरला, त्यामुळे हैदराबादवर दबाव वाढला. पॉवरप्लेमध्ये हैदराबादची फलंदाजी मंदावली आणि हैदराबादने पॉवरप्लेमध्ये या हंगामात सर्वात कमी धावसंख्या उभारली.
पॉवरप्लेमध्ये हैदराबाद संघाला दोन विकेट्सवर केवळ ३७ धावा करता आल्या. मात्र, नितीश रेड्डीसह हेडने डावाला गती दिली आणि दोन्ही फलंदाजांनी तिसऱ्या विकेटसाठी ९६ धावा जोडून हैदराबादची सामन्यात वापसी केली. दरम्यान, हेडने या हंगमातील चौथे अर्धशतकही झळकावले. मात्र, आवेश खानने हेडला क्लीन बोल्ड करत डाव संपवला.
हेड बाद झाल्यानंतर नितीश रेड्डीने आपला गियर बदलला आणि आक्रमक फलंदाजी करत आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याला दुसऱ्या टोकाला असलेल्या हेनरिक क्लासेनची चांगली साथ लाभली. जो मोठे फटके मारत राहिला. हैदराबादने पहिल्या १० षटकात ७५ धावा केल्या होत्या, परंतु हेड, नितीश आणि क्लासेनच्या स्फोटक खेळीमुळे हैदराबादने पुढील ६० चेंडूत १२६ धावा केल्या आणि फक्त एक विकेट गमावली. या काळात क्लासेन आणि नितीश यांच्यात चौथ्या विकेटसाठी ७० धावांची भागीदारी झाली. फिरकी गोलंदाज युजवेंद्र चहल या सामन्यात चांगलाच महागडा ठरला आणि त्याने चार षटकांच्या स्पेलमध्ये ६२ धावा दिल्या.

# कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनावर आधारित 'कर्मवीरायण' सिनेमा

सध्या चित्रपटसृष्टीमध्ये इंडस्ट्रीमध्ये बायोपिकची क्रेझ पाहायला मिळत आहे. एकापाठोपाठ एक बायोपिक प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. आता महाराष्ट्राच्या खेडोपाडी शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या, रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून गरीब, गरजू, कष्टकऱ्यांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणारे शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांचं जीवनचरित्र आता मोठ्या पडद्यावर येत आहे. अभिनेते किशोर कदम यांनी कर्मवीरांची भूमिका साकारली असून, अनेक महोत्सवांमध्ये गौरवलेला हा चित्रपट आता १७ मे पासून महाराष्ट्रात प्रदर्शित होत आहे. कर्मवीर अण्णांच्या जीवनातील काही निवडक प्रसंग आणि घटना यांचा समावेश या चित्रपटात करण्यात आला आहे.
लहान वयातच महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांचा प्रभाव




पडलेल्या भाऊराव पाटील यांनी शिक्षणाचं महत्त्व ओळखून ग्रामीण भागात शिक्षण संस्था सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्या काळात समाजात वर्चस्ववाद बोकाळला होता. त्यामुळे गरीब आणि बहुजनांची मुले शिक्षणापासून वंचित राहत होती. त्या मुलांनाही शिकण्याचा समान हक्क आहे असा भाऊराव पाटील यांचा ठाम विचार होता.
त्या काळी अनेक लोकांनी भाऊरावांना विरोध केला. मात्र विरोधाला ज जुमानता शिक्षणाच्या प्रसाराचं कार्य सुरूच राहिलं आणि विविध शिक्षण संस्था उभ्या राहिल्या. शहरातील विद्यार्थ्यांप्रमाणेच ग्रामीण भागातील विद्यार्थीही शिक्षणाकडे वळू लागले. त्यामुळेच ग्रामीण भागातील साक्षरतेचे प्रमाण वाढण्यास मदत झाली. महाराष्ट्राला शिक्षणाच्या मार्गावर नेणारे भाऊराव कर्मवीर झाले. शिक्षणासाठी धडपडणाऱ्या एका ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्वाचा जीवनपट आता चित्रपटाद्वारे पाहता येणार आहे.
ट्रान्सएफएक्स स्टुडिओज प्रा. लि. यांनी निर्मिती केलेल्या कर्मवीरायण चित्रपटाची प्रस्तुती ७ वंडर्स चे पुष्कर मनोहर करत आहेत. धनंजय भावलेकर यांनी चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. अनिल सपकाळ आणि धनंजय भावलेकर यांनी चित्रपटाची पटकथा लिहिली आहे. किशोर कदम, सुहास शिरसाट, उपेंद्र लिमये, देविका दफ्तरदार, उषा नाईक अशा दिग्गज कलाकारांचा सशक्त अभिनय पाहायला मिळणार आहे. योगेश कोळी यांनी छायाचित्रण, संतोष गोठोस्कर यांनी संकलक म्हणून काम पाहिले आहे.




# नवी मुंबई पालिकेच्या सर्व कार्यालयात व प्रेक्षणीय ठिकाणी सेल्फी स्टँडव्दारे मतदान जनजागृती

## नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सेल्फी काढत मतदान करण्याचे केले आवाहन

नवी मुंबई : २० मे रोजी ठाणे लोकसभा मतदारसंघाची निवडणूक होत असून यामध्ये प्रत्येक मतदाराने मतदान करून आपला मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी स्वीप कार्यक्रमांतर्गत मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात येत आहे. यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्रीय स्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून त्याला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

मतदार जनजागृतीसाठी विविध माध्यमांचा वापर करताना सध्याच्या सोशल मिडियाप्रेमी युगात लोकांमध्ये असलेली सेल्फी छायाचित्र काढण्याची आवड लक्षात घेता मतदार जनजागृतीचे सेल्फी स्टँड तयार करून ते महानगरपालिका मुख्यालयासह आठही विभाग कार्यालये तसेच ऐरोलीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, वंडर्स पार्क, निसर्गोद्यान, मनपा रूग्णालये व इतर मनपा कार्यालयांमध्ये ठेवण्यात आले आहेत. विष्णुदास भावे नाट्यगृहातही सेल्फी स्टँड ठेवण्यात आला असून तेथेही कलाकार आणि नाट्यरसिक यांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. अनेक कलावंतानी तर नाट्यगृहात प्रयोगासाठी आल्यानंतर नागरिकांना मतदान करण्याविषयी आवाहन करणारे रिल्स बनवून सामाजिक बांधिलकी जपलेली आहे.

महापालिका मुख्यालयातील सेल्फी स्टँडवर नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सेल्फी काढून नागरिकांना २० मे रोजीच्या लोकसभा निवडणूकीत मतदान करण्याचे आवाहन केले आहे. लोकशाही बळकट करणे हे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य असून त्याकरिता संविधानाने आपल्याला दिलेला मतदानाचा अधिकार हक्काने बजावावा असा संदेश आयुक्तांनी सेल्फीच्या माध्यमातून दिलेला आहे.

नवी मुंबई नागरिकांनी या सेल्फी स्टँडवर आपले सेल्फी छायाचित्र काढून ते सोशल मिडियाच्या फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स, व्हॉट्सप आणि इतर लोकप्रिय समाज माध्यमांतून प्रसारित करावे आणि स्वत: मतदान करावेच व इतरांनाही मतदान करण्याविषयी सेल्फीच्या माध्यमातून प्रोत्साहित करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# नवी मुंबईत ५३५ आणि पनवेलमध्ये ७९ धोकादायक बांधकामे

नवी मुंबई : नवी मुंबई महापालिका क्षेत्रात गेल्या वर्षी ५१४ धोकादायक इमारती होत्या. यंदा ही संख्या ५३५ झाली असून नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील धोकादायक इमारतीचे सन २०२४-२५ या वर्षासाठी सर्वेक्षण करण्यात आले आहे. सर्वेक्षणानंतर एकूण ५३५ इमारती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६४ नुसार धोकादायक इमारती म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६५(अ) नुसार ज्या इमारतींचा वापर सुरू होऊन ३० वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला आहे, अशा इमारतींचे नवी मुंबई महानगरपालिकेकडे नोंदणी केलेल्या बांधकाम अभियंत्याकडून ३० सप्टेंबर २०२४ पूर्वी संरचना अभियंत्याकडून संरचना परीक्षण करून घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. नवी मुंबई शहरातील नागरीकांनी धोकादायक इमारतींचा संरचनात्मक अहवाल ३० सप्टेंबरपूर्वी करून न घेतल्यास २५ हजार रुपयांचा दंड केला जाणार आहे, महापालिकेने पाठविलेल्या सूचनेत नमूद करण्यात आले आहे. महापालिकेच्या सर्वेक्षणानुसार शहरात ५३५ धोकादायक इमारती आहेत.

### महापालिकेची सूचना

नागरिकांकडून धोकादायक इमारतींचा / घराचा रहिवास / वापर तात्काळ थांबविण्यात यावा असे आवाहन करण्यात येत आहे. अन्यथा दुर्दैवी अपघात घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधितांची राहील याची नोंद घेण्यात यावी असे महापालिकेच्या वतीने सूचित करण्यात आले आहे.

### पनवेलमध्ये ७९ धोकादायक बांधकामे

पनवेल महापालिका क्षेत्रात ७९ धोकादायक मालमत्ता असून पालिकेने जाहीर प्रसिद्धी पत्रकातून या मालमत्तांच्या भोगवटाधारकांना पावसाळ्यापूर्वी संबंधित जागा रिकामी करण्याचे आदेश दिले आहेत. ३० वर्षे जुने बांधकाम असल्यास बांधकाम अभियंत्याकडून स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचा नियम आहे. काही वर्षांपूर्वी पनवेलमध्ये धोकादायक इमारत कोसळली होती. अतिवृष्टीमध्ये पनवेलमध्ये धोकादायक इमारतीमध्ये अनुचित घटना घडू नये यासाठी पालिकेने खबरदारी म्हणून मे महिन्यापासून धोकादायक इमारतींच्या मालमत्ताधारकांना सूचना पत्रातून जागृत करण्याचे काम केले आहे. धोकादायक इमारतींमध्ये अनुचित प्रकार घडल्यास संबंधित मालमत्तेचे मालक हेच जबाबदार राहतील असे सूचना पत्रातून कळविले आहे.

# अतिरिक्त फीसाठी निकाल राखीव

## उरणमध्ये पालक संघटनेची शाळेविरोधात पोलिसांत धाव

उरण : येथील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित युईएस शाळा व्यवस्थापनाने ओळखपत्र, डायरी, ई-लर्निंगची अतिरिक्त फी न भरणाऱ्या विद्यार्थ्याचे निकाल देण्यास नकार दिला. यामुळे संतप्त झालेल्या पालक संघटनेचे पदाधिकारी, पालक, विद्यार्थ्यांनी शाळा व्यवस्थापनाविरोधात गुन्हा नोंद करण्यासाठी पोलीस ठाण्यात धाव घेतली.राज्यभर बुधवारी महाराष्ट्र दिनाची धामधूम असतानाच उरणमध्ये मात्र पालक- विद्यार्थ्यांना न्यायासाठी पोलिसांत धाव घ्यावी लागल्याने शाळा व्यवस्थापनाच्या मनमानी कारभाराविरोधात नागरिकांनी संताप व्यक्त केला. उरण एज्युकेशन सोसायटीची विद्यार्थ्यांकडून ओळखपत्राच्या नावाखाली ५५०, डायरी-१००, ई-लर्निंग-१२०० अशी अतिरिक्त शुल्काची रक्कम शाळा व्यवस्थापनाकडून वसूल करीत असल्याचा आक्षेप घेत पालक-शिक्षक संघटनेचे पदाधिकारी यांनी विरोध केला आहे.

■ या संदर्भात उरण पंचायत समितीच्या शिक्षण विभागानेही २९ एप्रिल २०२४ रोजी ओळखपत्र, डायरी आदी अतिरिक्त फी वसुलीसाठी कोणत्याही विद्यार्थ्यांचे निकाल रोखता येणार नाहीत असे लेखी आदेश दिले आहेत. त्यामुळे पालकांनी शाळा व्यवस्थापनाच्या विरोधात कॅपिटेशन ॲक्ट तरतुदींचा भंग केल्याप्रकरणी व्यवस्थापनावर गुन्हा नोंद करण्यासाठी उरण पोलिस ठाण्यात जमा झाले होते.

■ मात्र उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम यांनी शाळा व्यवस्थापन आणि पालक-शिक्षक संघटनेचे पदाधिकारी यांची संयुक्त बैठक घेऊन यावेळी शाळा व्यवस्थापनाने अतिरिक्त फी वसुली न करता विद्यार्थ्यांना निकाल देण्याचे मान्य केले. तसे संदेश पालकांना व्हॉट्सॲपवर कळविण्यासही संमती दिली. यानंतरच पालक शिक्षक संघटनेचे पदाधिकारी, पालक माघारी परतले.

# सहस्त्रपती स्पर्धक; अब्जाधीश उमेदवारांसमोर अपक्ष, छोट्या पक्षांच्या उमेदवारांचे आव्हान

ठाणे (गणेश भोईटे) : लोकसभा निवडणूकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. ठाणे जिल्ह्यातील ठाणे, भिवंडी आणि कल्याण मतदारसंघातील लोकसभा निवडणूकांमधील इंडिया आघाडी आणि महायुतीचे उमेदवार ठरले आहेत. असे असले तरी या मतदार संघातून काही अपक्ष आणि स्थानिक लहान पक्षाकडूनही उमेदवार दिले जातात. ज्या उमेदवारांच्या हाती ५० हजार किंवा त्यापेक्षाही कमी रोकड आहे. अशा उमेदवारांनीही आपली उमेदवारी दाखल केली आहे. यामधील काही उमेदवारांकडे स्वत:ची किंवा त्यांच्या कुटुंबियांच्या नावे स्थावर मालमत्ताही नाही. त्यामुळे कोट्यधीश उमेदवारांसमोर काही हजार रुपये घेऊन लढणारे उमेदवारही रिंगणात उभे असल्याचे समोर येत आहे.

ठाणे जिल्ह्यात ठाणे, भिवंडी आणि कल्याण मतदारसंघ आहे. या तिन्ही मतदारसंघात इंडिया आघाडी आणि महायुतीच्या उमेदवारांमध्ये थेट लढत आहे. असे असले तरी काही अपक्ष, स्थानिक तसेच लहान पक्षांच्या उमेदवारांनीही त्यांचे नशीब आजमाविण्याचा निर्णय घेतला आहे. २६ एप्रिलपासून पाचव्या टप्प्यातील निवडणूकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरूवात झाली आहे. ३ मे या दिवशी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारिख आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी एक दिवस शिल्लक आहे. त्यामुळे उमेदवारांची अर्ज दाखल करण्यासाठी लगबग सुरू आहे.

## ५० हजारहून कमी रोकड असलेल्या उमेदवारांची संख्या

ठाणे लोकसभेत बुधवारपर्यंत आठ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. यामध्ये ठाकरे गटाचे खासदार राजन विचारे यांचा सामावेश आहे. तर महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांनी उमेदवारी अर्ज दाखल केलेला नाही. कल्याण लोकसभेच्या जागेसाठी सहा आणि भिवंडी लोकसभेच्या जागेसाठी पाच उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. या दोन्ही मतदारसंघात महायुती आणि इंडिया आघाडीने उमेदवार जाहीर केले आहेत. या तिन्ही लोकसभेच्या जागा चुरशीच्या मानल्या जात आहेत. भिवंडी वगळता इतर दोन जागांवर महायुती आणि इंडिया आघाडी अशी थेट लढत आहे. असे असले तरी काही अपक्षांनीही उमेदवारीसाठी अर्ज दाखल केले आहेत.

ठाणे, भिवंडी आणि कल्याण लोकसभा मतदारसंघातील महत्त्वाचे उमेदवार कोट्यधीश असले तरी काही उमेदवार हे केवळ ५० हजार किंवा त्यापेक्षा कमी रोकड हाती घेऊन निवडणूक लढवित आहेत. तिन्ही मतदारसंघात हाती ५० हजारहून कमी रोकड असलेल्या उमेदवारांची संख्या सहा आहे. यातील काही जणांकडे दुचाकी वाहन आहे. तर काहीजणांकडे ते वाहन देखील नाही. या सर्व उमेदवारांकडे स्थावर मालमत्ता नाही. यातील बहुतांश उमेदवार स्थानिक पक्षासंबंधीत आहेत.

भिवंडीत एकूण पाच उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहे. त्यापैकी एका उमेदवाराच्या हातात ५० हजार रुपये आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) सुरेश म्हात्रे, भाजपकडून केंद्रीय मंत्री कपिल पाटील आणि अपक्ष उमेदवार निलेश सांबरे हे कोट्यधीश उमेदवार या मतदारसंघात उभे आहेत. ठाणे मतदारसंघात आठ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. यापैकी तीन उमेदवारांकडे ५० हजाराहून कमी रक्कम हाती असून एका उमेदवाराकडे केवळ पाच हजार रुपये हाती आहेत. तर कल्याण मतदारसंघात सहा उमेदवारांनी अर्ज दाखल केले असून त्यापैकी दोघांकडे ५० हजारहून कमी रोकड आहे.

# टिटवाळा, अंबरनाथ आणि वाड्यात वीज चोरांविरुद्ध महावितरणची धडक कारवाई

कल्याण/वसई: एप्रिल महिन्यात महावितरणच्या टिटवाळा, अंबरनाथ पूर्व आणि वाडा उपविभागात वीज चोरांविरुद्ध धडक कारवाई करण्यात आली. टिटवाळा उपविभागात १२४ जणांविरुद्ध कारवाई करून ४१ लाख रुपयांची वीजचोरी उघडकीस आणण्यात आली. अंबरनाथ पूर्व उपविभागात मीटरमध्ये फेरफार करून वीजचोरी करणाऱ्या १९ ग्राहकांकडे २६ लाख ३५ हजार रुपयांची वीजचोरी आढळून आली. तर वाडा उपविभागात तब्बल १०४ जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली असून १ कोटी ९ लाख रुपयांची वीजचोरी उघडकीस आली आहे.

मुख्य अभियंता धनंजय औंढेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण परिमंडलात वीज चोरांविरुद्ध धडक कारवाई सातत्याने सुरू आहे. त्यानुसार टिटवाळा उपविभागातील जीआर नगर, बल्याणी गाव, आंबिवली रोड, वैष्णवी देवी चाळ, गुरुवली पाडा, शिवनगरी चाळ भागात एकाच दिवशी राबवलेल्या शोध मोहिमेत १२४ जणांकडे सुरू असलेल्या वीजचोऱ्या शोधण्यात यश आले. या १२४ जणांकडून सुमारे ४१ लाख रुपये किंमतीची १ लाख ८० हजार ८८१ युनिट विजेची चोरी झाल्याचे उघडकीस आले आहे. उपकार्यकारी अभियंता गणेश पवार, सहाय्यक अभियंता तुकाराम घोडविंदे, कनिष्ठ अभियंते सचिन पवार, अलंकार म्हात्रे यांच्या पथकांने ही कारवाई केली.

अंबरनाथ पूर्व उपविभागात ३३३७ ग्राहकांच्या वीज मीटरची तपासणी करण्यात आली. यात १९ वीज मीटरमध्ये फेरफार करण्यात आल्याचे आढळून आले. या १९ ग्राहकांनी २६ लाख ३५ हजार रुपये किंमतीची ९८ हजार ९९६ युनिट विजेची चोरी केल्याचे निष्पन्न झाले. अतिरिक्त कार्यकारी अभियंता जितेंद्र प्रजापती, सहाय्यक अभियंते वैशाली पाटील, प्रशांत नाहीरे, हरेश विशे, प्रतिक म्हात्रे, मोहित ठाकुर, रविंद्र नाहिदे, सहाय्यक लेखापाल मयुरी बोरसे यांच्या पथकांनी ही कारवाई केली.

तर वाडा उपविभागात वाडा शहर आणि ग्रामीण, गोऱ्हा, अंबाडी, कुडूस आदी भांगामध्ये राबवण्यात आलेल्या शोध मोहिमेत १०४ जणांकडे विजेचा चोरटा वापर आढळून आला. या १०४ जणंनी १ कोटी ९ लाख रुपयांची वीजचोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे. संबंधितांना चोरीच्या विजेचे देयक आणि तडजोडीची रक्कम भरण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या असून विहित मुदतीत या रकमेचा भरणा टाळणाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल होण्यासाठी पोलिसांत फिर्याद देण्यात येणार आहे. वाड्याचे उपविभागीय अभियंता अविनाश कटकवार, सहायक व कनिष्ठ अभियंते, जनमित्र तसेच सुरक्षारक्षक यांच्या चमुने ही कामगिरी केली.





काँग्रेसचे माजी नगरसेवक विक्रांत चव्हाण, राजेश जाधव तसेच शिष्ठमंडळ यांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांची सदिच्छा भेट घेऊन विविध विषयावर चर्चा केली. यावेळी ठाणे महिला अध्यक्ष, स्मिता वैती, दीपाली भगत, प्रदीप राव, राजेश जाधव, सचिन शिंदे, भालचंद्र महाडिक, मोतीराम भगत यांच्यासह आदि मान्यवर उपस्थित होते.




ठाणे लोकसभा मतदारसंघामधील ओवळा माजीवा वि. म. संघ कार्यक्षेत्रातील सहा. निवडणूक निर्णय अधिकारी श्रीम. शितल देशमुख, अधिकारी तथा उपायुक्त श्रीम. वर्षा दिक्षित यांच्या मार्गदर्शनानुसार ठाणे लोकसभा मतदारसंघातील ओवळा माजीवडा वि. म. संघात मिरा भाईंदर पालिका क्षेत्रात कै. गोपीनाथ मुंडे क्रीडा संकुल, न्यू गोल्डन नेस्ट, भाईंदर पूर्व येथे स्वीप अंतर्गत जनजागृती करण्यात आली.

# कल्याण डोंबिवलीतील वृक्ष विद्युत रोषणाई मुक्त





कल्याण : कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील झाडांवर करण्यात आलेली विद्युत रोषणाई काढून टाकून पालिकेच्या उद्यान विभागाने पालिका हद्दीतील वृक्ष प्रदूषक रोषणाई मुक्त केले आहेत. गेल्या आठवड्यापासून ही मोहीम उच्च न्यायालयाच्या आदेशावरून कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाने सुरू केली होती.

पालिका हद्दीतील अनेक झाडांवर काही हॉटेल, ढाबे मालकांनी विद्युत रोषणाई करून झाडांचे विद्रुपीकरण, विद्युत रोषणाई करून प्रदूषण निर्माण केले होते. झाडांवरील पक्ष्यांच्या अधिवासाला, जैवविविधतेला धोका पोहोचविला होता. याविषयी मुंबई उच्च न्यायलयात एक जनहित याचिका दाखल झाली होती. त्यावेळी न्यायालयाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व पालिकांना आपल्या हद्दीत झाडांवर विविध व्यावसायिक, नागरिकांकडून करण्यात आलेली विद्युत रोषणाई तातडीने हटविण्याचे आदेश दिले होते.

कल्याण डोंबिवली पालिकेने टिटवाळा, कल्याण पूर्व, पश्चिम, डोंबिवली पूर्व, पश्चिम, शिळफाटा रस्ता भागातील झाडांवर हॉटेल्स व्यावसायिक, शिकवणी चालक, विकासक, गॅरेज चालक, ढाबे मालक यांनी केलेली विद्युत रोषणाई काढून टाकली. याशिवाय झाडांवर खिळे ठोकून जाहिराती लावणे, झाडांना बाधा होईल अशा प्रकारची कृती करणे अशा नागरिकांवर कारवाई करण्याचा निर्णय मुख्य उद्यान अधीक्षक संजय जाधव यांनी घेतला आहे.

पालिका हद्दीतील सुमारे तीनशेहून अधिक झाडांवरील विद्युत रोषणाई काढून टाकण्यात आली आहे. या कामासाठी उद्यान विभागाने विशेष पथके तयार केली होती. झाडांना विद्युत रोषणाई केल्याने या झाडांवरील पक्ष्यांच्या अधिवासाला धोका उत्पन्न होत असल्याचे, याशिवाय झाडावर विविध प्रकारचे परिणाम होत असल्याची निरीक्षणे पर्यावरण अभ्यासकांनी काढली आहेत. मुख्य उद्यान अधीक्षक संजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली डोंबिवलीचे उद्यान अधीक्षक महेश देशपांडे आणि पथकाने ही कारवाई केली.

**पालिका हद्दीतील झाडांवर नागरिक, व्यावसायिकांकडून करण्यात आलेली सर्व विद्युत रोषणाई काढून टाकण्यात आली आहे. अशाप्रकारची कृती कोणीही केली तर त्यांच्यावर यापुढे कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. तसेच झाडांना खिळे ठोकून जाहिराती लावणाऱ्यांवरही कारवाई केली जाणार आहे. - संजय जाधव, मुख्य उद्यान अधीक्षक, कडोंमपा.**

### ठाणे मतदारसंघात भाजपमध्ये नाराजीनाट्य

# नवी मुंबई, भाईंदरच्या पदाधिकाऱ्यांचे सामुदायिक राजीनामे

नवी मुंबई : ठाणे मतदारसंघ शिंदे गटाकडे गेल्यामुळे नाराज झालेल्या नवी मुंबई आणि मिरा-भाईंदरमधील गणेश नाईक समर्थकांनी गुरुवारी आक्रमक भूमिका घेत मुंबईतील भाजपच्या प्रदेश कार्यालयात निदर्शने केली व सामुदायिक राजीनामे दिले. त्यामुळे प्रचाराला कमी कालावधी उरला असताना मुख्यमंत्र्यांच्या बालेकिल्ल्यात महायुतीमधील बेबनाव समोर आला आहे.

ठाण्यातून नरेश म्हस्के यांना बुधवारी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर पुढील दिशा ठरविण्यासाठी नाईकांनी त्यांच्या खैरणे येथील कार्यालयात बैठक घेतली. यावेळी आक्रमक झालेल्या नाईक समर्थकांनी मुख्यमंत्री आणि म्हस्के यांच्यावर आरोपांच्या फैरी झाडल्या. बैठक सुरु असताना नाईकांची भेट घेण्यासाठी आलेल्या प्रताप सरनाईक आणि म्हस्के यांच्या समोरच घोषणाबाजी झाली व त्यांना भेटण्यास पदाधिकाऱ्यांनी नकार दिला. त्यानंतर नाईकांनी आपल्या विशेष कक्षात त्यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर सरनाईक व म्हस्के मागील दाराने परत गेले. नाईक यांच्या कडव्या समर्थक माजी नगरसेविका नेत्रा शिर्के यांनी 'उमेदवारी डावलणे म्हणजे हा ठाण्यात बसून नवी मुंबईचा घास घेण्याचा प्रकार आहे', अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांना अप्रत्यक्षपणे लक्ष्य केले. त्यानंतर सर्व पदाधिकाऱ्यांनी एकत्रितपणे मुंबईतील प्रदेश भाजपचे मुख्यालय गाठले व आपला राजीनामे सादर केले. पाचशेपेक्षा अधिक पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रीय सहसंघटन मंत्री सजीश जी. यांच्याकडे राजीनामे सादर केल्याचे नवी मुंबई भाजपचे उपाध्यक्ष रविंद्र इथापे यांनी 'लोकसत्ता'ला सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघात नरेश म्हस्के यांचा किमान दोन लाख मतांनी पराभव होईल, असा दावाही त्यांनी केला.

### मंदा म्हात्रेंची वेगळी चूल

नाईक समर्थकांनी आक्रमक भूमिका घेतली असतानाच बेलापूरच्या भाजप आमदार मंदा म्हात्रे यांनी मात्र नवी मुंबई भाजप नरेश म्हस्के यांच्या पाठीशी असल्याचा दावा केला. राजीनामे देणारे नाईक समर्थक होते. संपूर्ण भाजपचा म्हस्केंना विरोध आहे असे समजण्याचे कारण नाही, असे त्या म्हणाल्या. भाजपच्या मुंबईतील प्रदेश कार्यालयात धरणे धरत नाईक समर्थक पदाधिकाऱ्यांनी ठाण्याची जागा भाजपला मिळावी यासाठी आग्रह धरला.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१